जा. क्रं.उमाशि-२/संमा/शिबिर/पुवि/२०१४/ ९e३२ε
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,
दि :- १६/८/२०१४

16 AUG 2014

प्रति,

१. प्राचार्य, वालचंद महाविद्यालय, सोलापूर
२. प्राचार्य, उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर
३. प्राचार्य, न्यू आर्टस् सायन्स व कॉमर्स कॉलेज, अहमदनगर
४. प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर
५. प्राचार्य, कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे
६. प्राचार्य, नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे
७. प्राचार्य, जयहिंद हायस्कूल व ज्युनि कॉलेज, पिंपरी, पुणे
८. प्राचार्य, एस. व्ही. युनियन हायस्कूल ज्युनिअर कॉलेज, पुणे

विषय - शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पटपडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता शिबीराचे आयोजनाबाबत.

शैक्षणिक वर्ष सन २०१०-११ पासून पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता आणि तक्ता **अ** व **ब** मधील शिक्षकांच्या मान्यता पुढे चालू ठेवण्याबाबत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील संच मान्यतेची सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेली माहिती तपासून संच मान्यता तक्ता अ व ब मधील मान्यता आदेश देण्याबाबतच्या शिबीराच्या आयोजनाचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे.

आपल्या महाविद्यालयाची सदर शिबीराचे आयोजन करण्याबाबत निवड करण्यात आली आहे. ऑनलाईन पध्दतीने संच मान्यता व तक्ता अ व ब मधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मान्यता देण्याबाबत आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधा (उदा. चार संगणक, चार प्रिंटर, इंटरनेट कनेक्शन, अखंडीत वीजपुरवठयासाठी जनरेटर बॅकअप सुविधा, आवश्यक ती स्टेशनरी, वगैरे) उपलब्ध करावी. ऑनलाईन संच मान्यता व शिक्षक मान्यतेच्या शिबीराबाबत आपले बहुमोल सहकार्य मिळावे ही विनंती.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर.
मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १.